REGISTRATION NO.MH-24-0053343

# विश्व मत

सोमवार 07-10-2024, महाराष्ट्र

विश्वमत NEWS

संपादक - आश्रुबा कोठावळे
मो. 9403391734

# श्रुती शिरसाट आणि नंदिनी त्यागी यानी आझाद मैदानाचावर सायबर जागरुकतेचे कार्य




## श्रुती शिरसाट आणि नंदिनी त्यागी यानी आझाद मैदानाचावर सायबर जागरुकतेचे कार्य

श्रुती शिरसाट आणि नंदिनी त्यागी यानी आझाद मैदानाचावर सायबर जागरुकतेचे कार्य

बा.णा. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे आणि क्विक हील फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर गुन्ह्यांविरुद्ध जागरुकता निर्माण करण्यासाठी एक विशेष मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत विद्यार्थ्यांनी विविध भागांत जाऊन सायबर सुरक्षेबाबत लोकांमध्ये जागरुकता पसरवण्याचे कार्य हाती घेतले आहे.

या मोहिमेच्या अंतर्गत, विद्यार्थी नंदिनी त्यागी आणि श्रुती शिरसाट यांनी 2 ऑक्टोबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील आझाद मैदानमधे शिक्षण संघ येथिल समाजातील लोकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरुकता निर्माण केली. या ठिकाणी पूर्ण महाराष्ट्र महाराष्ट्रातील शिक्षक वर्ग उपस्थीत होता.

या आझाद मैदानावरील सायबर जागरुकता मोहिमेच्या यशानंतर, गपाट महादेव धाराशिव जिल्ह्यातील स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले, सावित्रीच्या लेकीची उपमा दिली आणि अशा प्रकारचे कार्य सातत्याने सुरू ठेवण्याचा सल्ला दिला. तसेच, समाजातील इतर लोकांमध्येही अधिक जागरुकता पसरवण्यासाठी पुढील संपर्क साधावा, असे आवाहन केले. या मोहिमेतील विद्यार्थ्यांचे उद्दिष्ट म्हणजे समाजातील अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचून त्यांना सायबर सुरक्षित बनवणे, ज्यामुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण कमी होईल आणि समाज अधिक सुरक्षित होईल.